# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.10.2024** **वार – सोमवार**

---

**किरेन रिजिजू**

आगामी काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली. विरोधक संविधानाबद्दल सामान्य नागरिकांची दिशाभूल करत आहे. नागरिकांच्या मनातील हा संभ्रम दूर व्हावा, याकरता संविधान भवनाच्या माध्यमातून वास्तव स्थितीची माहिती करून देण्यात येईल असं रिजिजू म्हणाले. केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक सहकार्यातून उभारण्यात येणाऱ्या या संविधान भवनातून अल्पसंख्याक वर्गाच्या समस्यांचा निपटारा करण्यात येईल, तसंच महाराष्ट्रातील बौद्ध विहारांचा विकास करण्यात येईल असंही रिजिजू म्हणाले.

**हर्षवर्धन पाटील**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि त्यांच्या कन्या अंकिता पाटील यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत इंदापूरमध्ये हा पक्षप्रवेश झाला. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे राष्ट्रवादीत प्रवेशाचा निर्णय घेतल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी सांगितलं.

**राज ठाकरे**

महाराष्ट्राच्या बिघडलेल्या राजकीय वातावरणाबाबत साहित्यिकांनी त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून परखडपणे व्यक्त व्हावं; आपल्यावर टीका होईल अशी भीती साहित्यिकांनी बाळगू नये, असं स्पष्ट मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं होणाऱ्या आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचं अनावरण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहत झालं; त्यावेळी ठाकरे बोलत होते. महाराष्ट्राचा खालावत चाललेला राजकीय स्तर रोखण्यासाठी साहित्यिकांनी सामाजिक चळवळ उभी केली पाहिजे; इलेक्ट्रॉनिक माध्यमांनीदेखील तारतम्य बाळगत काम केलं पाहिजे अशी अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

**गदिमा**

मराठी भाषेचं वैभव वाढवणारे ज्येष्ठ लेखक गीतकार गदि माडगूळकर यांचं देखणं स्मारक उभारण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होण्याकरता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना दिले. कोथरूडमध्ये महात्मा सोसायटीजवळ गदिमांचं स्मारक उभारण्याचं काम सुरू असून पहिल्या टप्प्याचं काम जवळपास पूर्ण झालं आहे; या कामाची पाहणी केल्यानंतर पाटील बोलत होते.

**हमाल पंचायत**

कष्टाची भाकर, उपक्रम कोणत्याही सरकारी अनुदानाशिवाय अविरतपणे सुरू आहे. या उपक्रमाचा, दिशादर्शक म्हणून, शालेय पोषण आहार योजनेसाठी उपयोग करता येईल असं प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी नुकतंच पुण्यात केलं. हमाल

पंचायत 'कष्टाची भाकर' या सेवाभावी उपक्रमाला पन्नास वर्ष पूर्ण झाली; त्यानिमित्त 'शालेय पोषण आहार आणि त्यासमोरील आव्हाने' या विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**अत्याचार प्रकरण**

बोपदेव घाटात महाविद्यालयीन तरुणीवर झालेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणाच्या तपासासाठी पोलिस कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करणार आहेत. या प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्यास पोलिसांकडून दहा लाख रुपयांचं रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या प्रकरणी दोनशेहून अधिक सराईतांची चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती पोलीस सह-आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली आहे.

**नोटीस**

पुणे शहरामध्ये पाण्याचा अतिरिक्त वापर करणाऱ्या सोसायट्या आणि बंगल्यांना महानगरपालिकेनं नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. 24 तास समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळ जोडणीला मीटर बसवण्याचं काम सुरू आहे. यामध्ये मोठ्या गृहनिर्माण संस्था आणि बंगल्यांमध्ये निकषापेक्षा जास्त पाण्याचा वापर होत असल्याचं समोर आल्याने त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

**सांकेतिक भाषा**

जागतिक सांकेतिक भाषा आणि जागतिक कर्णबधीर दिन नुकताच झाला; यानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशननं जनजागृतीपर पथनाट्यं सादर केली; तसंच जनजागृती फेरीही काढली. दिव्यांग भवनात सांकेतिक भाषेचे वर्ग लवकरच सुरू करण्यात येतील असं फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांनी सांगितलं.

**पुणे मॅरेथॉन**

पुण्याच्या क्रीडा विश्वात मानाची समजली जाणारी 38वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा एक डिसेंबर रोजी होणार असून या स्पर्धेच्या नाव नोंदणीला सुरुवात झाली आहे. स्पर्धा प्रवेशाची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर आहे. www.Marathon Pune.com या संकेतस्थळावरून प्रवेश अर्ज भरता येईल. ही स्पर्धा पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन, दहा किलोमीटर, पाच किलोमीटर, तीन किलोमीटर आणि दिव्यांग दौड अशा विविध गटात होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या वीजांसह हलक्या पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे. कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**